# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.03.2024** **वार-शुक्रवार**

---

**मतदान जनजागृती**

लोकसभा निवडणुकीत सर्व नवमतदारांनी शंभर टक्के मतदान करून लोकशाहीच्या या महत्त्वाच्या प्रक्रियेत सहभागी व्हावं असं आवाहन आकुर्डीच्या प्राध्यापक रामकृष्ण मोरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर बी जे लोबो यांनी केलं. महाविद्यालयात आयोजित मतदार जागृती मोहीमेत ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मतदानाची शपथ घेतली. यंदा प्रथमच मतदानाचा हक्क बजवणार असल्याने या विद्यार्थ्यांमध्ये मतदानाबाबत उत्साह दिसून आला. संस्थेतील प्राध्यापक, तसंच इतर कर्मचाऱ्यांनीही आगामी निवडणूकीमध्ये मतदान करण्याची शपथ घेतली.

**सदानंद मोरे**

आजची तरुणाई राजकारणाकडे आकर्षित होत आहे; ते काही वाईट नाही; पण पक्षनिरपेक्ष समाजकार्य करणारे तरुण, समाजासाठी मोलाचे आहेत, असं मत संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉक्टर सदानंद मोरे यांनी व्यक्त केलं. 'वंदे मातरम्' संघटनेच्या चाळीसाव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित 'देशभक्ती पुरस्कार' वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रेणू गावसकर यांना 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. ग्राहक पेठचे कार्यकारी संचालक सूर्यकांत पाठक, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, लेखक शरद तांदळे, खेळाडू अनिल मुंढे, सामाजिक कार्यकर्ते जावेद खान, उद्योजक राहुल पापळ यांना 'व्यर्थ ना हो बलिदान देशभक्ती पुरस्कार' आणि ॲडवोकेट असीम सरोदे यांना 'विशेष सामाजिक पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

**पाणीपट्टी**

पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे काल अखेर 155 कोटी रुपयांची पाणीपट्टी जमा झाली आहे. पाणीपट्टीची 794 कोटी 56 लाख रुपयांची थकबाकी आहे. विशेष म्हणजे यातील 275 कोटी रुपये विविध शासकीय कार्यालयांकडे थकीत आहेत, असं महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकुमार जगताप यांनी पत्रकारांना सांगितलं.

**शाश्वत पाणी**

शाश्वत पाण्यासाठी मानवाने जेवढी नैसर्गिक संसाधनं वापरली; तेवढ्याच प्रमाणात ती निसर्गाला परत केली पाहिजेत. निर्सगाकडून कोणीही काहीही फुकट घेता कामा नये, अशी अपेक्षा आदर्श गाव प्रकल्प समितीचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांनी पुण्यात व्यक्त केली. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सच्या पुणे केंद्राच्या वतीने 'मानवी अस्तित्व आणि शाश्वत पाणी' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. या वेळी पवार यांनी नगर जिल्ह्यातील हिवरेबाजार या छोट्याशा दुष्काळी गावाचा कायापालट कसा केला, याची सविस्तर यशोगाथा सांगितली.

**एसटी**

एसटी महामंडळाच्या पुणे विभागातील डिझेलवर चालणाऱ्या सुमारे 500 बसगाड्या सीएनजीवर रूपांतरीत केल्या जाणार आहेत. सध्या डिझेलवर चालणाऱ्या 60 गाड्या सीएनजीवर धावत आहेत; उर्वरित गाड्या टप्प्याटप्प्यानं सीएनजीवर धावू लागतील

असं विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

**हरित लवाद**

पुण्यातील कात्रज तलावात आणि देहूमध्ये इंद्रायणीच्या तीरावर प्रदूषणामुळं हजारो माशांचा मृत्यू झाल्याप्रकरणी राष्ट्रीय हरित लवादाच्या दिल्लीतील मुख्य खंडपीठानं स्वतःहून दखल घेतली आहे. आगामी महिनाभरात त्यासंबंधीचं लेखी स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश लवादानं राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत.

**मद्य विक्री बंदी**

आगामी लोकसभा निवडणुकीचं वेळापत्रक लक्षात घेऊन पुणे जिल्हा प्रशासनानं जिल्ह्यातील दारू विक्रीवर निर्बंध जाहीर केले आहेत. जिल्ह्यातील चार लोकसभा मतदार संघांत दोन टप्प्यात मतदान होणार आहे. मतदानाच्या आणि मतमोजणीच्या तारखा लक्षात घेऊन आगामी 5, 6,11, 12 आणि 13 मे तसंच मतमोजणीच्या दिवशी म्हणजे 4 जून रोजी जिल्ह्यात मद्य विक्रीला मनाई करण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत.

**अतिरिक्त पदभार**

पुणे महापालिकेच्या चार उपायुक्तांकडे काही विभागांचे अतिरिक्त पदभार देण्यात आले आहेत. उपायुक्त महेश पाटील, जयंत भोसेकर, गणेश सोनुने आणि संजय शिंदे यांच्याकडे विविध विभागांची अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली आहे.

**एएफएमसी**

लष्करी वैद्यकीय सेनेचा 260 वा वर्धापन दिन येत्या 3 एप्रिलला साजरा होत आहे, यानिमित्त पुण्यातील लष्करी वैद्यकीय महाविद्यालयानं आज वॉकेथॉन आणि सायक्लोथॉनचं आयोजन केलं होतं. लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल अजय कुमार सिंग, एएफएमसीचे संचालक लेफ्टनंट जनरल नरेंद्र कोतवाल यांच्यासह अन्य मान्यवरांनी हिरवा झेंडा दाखवून या उपक्रमाचा प्रारंभ केला. एएफएमसीचे आजी माजी अधिकारी, कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय अशा सुमारे 700 जणांनी यामध्ये सहभाग घेतला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर प्रचंड उकाडा जाणवत असून आज कमाल तापमान 39 अंश तर किमान तापमान 23 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान 39 अंशांच्या आसपास असेल; तसंच दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**